92648/64

**कायम विनाअनुदान तत्त्वावर**
(माध्यम इंग्रजी)

जा.क्र प्राशि- ३, खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे- १, यांचे कार्यालय.
दिनांक : 6 JAN 2011

05/02/203

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पुणे.

विषयः सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . . .

संदर्भः १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/ प्र.क्र.६७८/प्राशि-३, दिनाक १८ ऑगष्ट २००९.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.शिऊसं/प्राशि ३/नखाप्राशा/पुवि-०९ २९१७२-७६ दिनांक २/१२/२००९
३. आपले पत्र क्र.खाप्राशा/५७२४ १०-११ दिनांक २२/१२/२०१०

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्त्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | | ५. | ६ |
| १ | सुफा एज्यु.सोसा.१०२, घोरपडे पठ,घोरपडे गार्डन समोर,पुणे ४२. | नोबल इंग्लिश स्कूल,६६६/६९, गुरुवार पेठ,छोटी मस्जिद समोर, पुणे ४२ | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणांकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताधा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि उचित उपस्थिती इ. गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

PRINCIPAL
...HOOL
...th,
Pune-42. Ph. 24463343